**4 था बिमस्टेक आपत्ती व्यवस्थापन सराव (14-15 जुलै 2025)**

16 जुलै 2025

भारताने 14-15 जुलै 2025 रोजी आभासी पद्धतीने 4थ्या बिमस्टेक आपत्ती व्यवस्थापन अभ्यासाचे आयोजन केले होते.

2. भारतीय राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने टेबलटॉप सराव म्हणून आयोजित केलेल्या या सरावात चक्रीवादळ आणि पुरांसाठी प्रादेशिक तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि ती वाढविण्यासाठी बिमस्टेक सदस्य देशांमधील आपत्ती व्यवस्थापन व्यावसायिकांचा सहभाग होता.

3. सहभागींनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन रचनेची तपशीलवार माहिती सादर केली. सिम्युलेटेड परिस्थितींमध्ये सहभाग नोंदविला. प्रतिसाद आकृतीबंधाचे मूल्यांकन केले आणि संपूर्ण प्रदेशात आपत्ती प्रतिसादासाठी समन्वय मजबूत करण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींचे आदान-प्रदान केले.

4. संकटाच्या वेळी आपल्या प्रदेशातील सहकाऱ्यांसोबत भारत नेहमी पहिला प्रतिसादक म्हणून ठामपणे उभा राहिला आहे. या सरावामुळे बंगालच्या उपसागर प्रदेशात आपत्ती तयारी, प्रतिसाद आणि स्वयंपूर्णता या दिशेने सहकार्य अधिक बळकट झाले.

नवी दिल्ली

16 जुलै 2025